दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. १२ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

मंगळवार, दि. १२ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, दशमी दुपारी २-५३ पर्यंत नंतर एकादशी तिथी, दिवस नक्षत्र– पूर्वाभाद्रपदा रात्री १-१८ पर्यंत नंतर उत्तराभाद्रपदा, चंद्र रास - कुंभ संध्याकाळी ७-२५ पर्यंत नंतर मीन, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### गोविंद पोवळे यांचे निधन

**मुंबई**: ज्येष्ठ भावगीत गायक, संगीतकार गोविंद पोवळे यांचे रविवारी अंधेरी येथील निवासस्थानी वृध्दापकाळाने निधन झाले. ते 93 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, सुयोग आणि सूरदास ही दोन मुले, तीन मुली, सुना,जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंधेरीच्या वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. एच. एम. व्ही. च्या वसंतराव कामेरकर यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी 'उमटली रामाची पाऊले' या गीताला संगीत दिले.

## सारांश वृत्त

### केरळ काँग्रेसमधील कलह उघडकीस

**नवी दिल्ली** : केरळमध्ये नेतृत्वासाठी सुरू असलेल्या संघर्षावरून माकपचे सरचिटणीस एम. ए. बेबी यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफवर टीका केली आणि म्हटले की, केरळमधील विरोधी पक्षनेत्याच्या नावाबाबत योग्य वेळी माकपची राज्य शाखा निर्णय घेईल. विधानसभेचे अधिवेशन बोलावण्यासाठी आपल्याला विरोधी पक्षाच्या विरोधात चर्चा करण्याची गरज आहे.

### पूर निवारणाच्या कामांना केंद्राची मंजुरी

**पुणे** : अर्बन चॅलेंज फंड (यूसीएफ) अंतर्गत पुण्यासाठी १,२९० कोटी रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा आणि पूर निवारण प्रकल्पांना केंद्र सरकारने सोमवारी मंजुरी दिली. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कामकाज मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्या शिखर समितीच्या बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी या प्रकल्पांबाबत सादरीकरण केले.

### खटले प्रलंबित असणे ही सरकारची चूक

**प्रयागराज** : १९९३ मध्ये आलेल्या 'दामिनी' या हिंदी चित्रपटातील प्रसिद्ध संवादाचा हवाला देत "तारीख पे तारीख... "मिल्ती है तो सिर्फ तारीख", असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे की, विलंबित न्यायाबद्दल सामान्य माणसाची धारणा प्रतिबिंबित करते, परंतु जिल्हा न्यायालयांमध्ये मोठ्या प्रमाणात फौजदारी खटले प्रलंबित असणे ही केवळ न्यायिक अधिकाऱ्यांची चूक नाही, तर प्रामुख्याने राज्य सरकार आणि पोलिसांची चूक आहे.

---

### मोदींच्या आवाहनावरून काँग्रेस आक्रमक; राहुल गांधींचा हल्लाबोल

# हे सल्ले नाहीत, सरकारच्या अपयशाचे पुरावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, परकीय चलन संरक्षण आणि काटकसरीबाबत केलेल्या आवाहनावरून काँग्रेसने केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी पंतप्रधानांवर निशाणा साधत, "हे सल्ले नाहीत, तर सरकारच्या अपयशाचे पुरावे आहेत," असा आरोप केला.

पंतप्रधान मोदी यांनी रविवारी तेलंगणा आणि कर्नाटकातील कार्यक्रमांमध्ये नागरिकांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे, मेट्रो आणि सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करण्याचे, 'वर्क फ्रॉम होम'ला प्राधान्य देण्याचे, अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे तसेच एक वर्ष सोन्याची खरेदी पुढे ढकलण्याचे आवाहन केले होते. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे आवाहन केले होते.

यावर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, "काल मोदींनी जनतेला बलिदान देण्यास सांगितले — सोने खरेदी करू नका, परदेशात जाऊ नका, पेट्रोल कमी वापरा, खते आणि खाद्यतेल कमी करा, मेट्रोचा वापर करा आणि घरून काम करा. हे काही सल्ले नाहीत, तर अपयशाचे पुरावे आहेत."

ते म्हणाले की, "वाढत्या आर्थिक दबावामुळे पंतप्रधान 'तडजोड' करत आहेत. १२ वर्षांच्या कारभारानंतर देश अशा स्थितीत पोहोचला आहे की, सरकारला नागरिकांना काय खरेदी करावे आणि काय करू नये, हे सांगावे लागत आहे."

काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम यांनीही सरकारवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "पंतप्रधानांच्या या गंभीर आवाहनामागील नेमके कारण काय आहे? सरकारने तातडीने संसदेचे अधिवेशन बोलावून देशाला वास्तविक परिस्थितीची माहिती द्यावी," अशी मागणी त्यांनी केली.

काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनीही केंद्रावर हल्लाबोल केला. "इराण-अमेरिका युद्धाला तीन महिने उलटून गेले, तरी सरकार भारताची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यात अपयशी ठरले आहे. आपत्कालीन उपाययोजना करण्याऐवजी जनतेला गैरसोयी सहन करण्यास सांगितले जात आहे," अशी टीका त्यांनी केली.

वेणुगोपाल म्हणाले की, "जेव्हा निवडणुका आणि राजकारण हीच सरकारची प्राथमिकता असते, तेव्हा त्याचा परिणाम आर्थिक संकटात होतो. सरकारने नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी पुरेसा इंधनसाठा आणि प्रभावी नियोजन करणे आवश्यक होते."

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी हैदराबादमधील सभेत बोलताना नागरिकांना सार्वजनिक वाहतूक, कारपूलिंग, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर आणि रेल्वेमार्गे मालवाहतूक वाढवण्याचे आवाहन केले. "कोविड काळात आपण वर्क फ्रॉम होम, व्हर्च्युअल मीटिंग आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगची सवय लावून घेतली. आता पुन्हा त्या पद्धती वापरण्याची वेळ आली आहे," असे ते म्हणाले.

---

# पुण्यातील १२ अधिकाऱ्यांवर कारवाई, राज्यभर पुनर्विलोकन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५ चा गैरवापर करून शेतकऱ्यांच्या जमिनी परस्पर इतरांच्या नावावर करण्यात आल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. शुद्धलेखन दुरुस्तीपुरता मर्यादित असलेला अधिकार वापरून काही अधिकाऱ्यांनी थेट जमिनींच्या मालकी नोंदी बदलल्याचे उघड झाल्यानंतर महसूल विभागाने कठोर कारवाईला सुरुवात केली आहे. या प्रकरणी पुण्यातील १२ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी पुण्यात पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, कलम १५५ चा राज्यभर मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकारांचा चुकीच्या पद्धतीने वापर करत जमिनींच्या नोंदी बदलल्या. त्याचा जमीन मालकांना फटका बसला आहे. "पुण्यातील १२ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले असून, उर्वरित संबंधितांवर पुढील पंधरा दिवसांत कारवाई केली जाईल," असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाचे पुनर्विलोकन सुरू करण्यात आले असून, ज्या जमिनी चुकीच्या पद्धतीने नावावर करण्यात आल्या आहेत, त्या मूळ मालकांना परत देण्याची प्रक्रिया हाती घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

देवस्थान इनाम जमिनींबाबतही सरकार महत्त्वाचे पाऊल उचलत आहे. या संदर्भातील कायद्याचा मसुदा महसूल विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

---

# बीड-जालना प्रकरण स्वतंत्रपणे ऐकण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर असलेली अनिश्चितता कायम असून, ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावर सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी जुलैमध्ये होणार आहे. न्यायालयाने बीड आणि जालना जिल्ह्यांतील निवडणुकांबाबत दाखल करण्यात आलेल्या स्वतंत्र अंतरिम अर्जावर तत्काळ निर्णय देण्यास नकार दिला असून, मुख्य प्रकरणासोबतच यावर सुनावणी घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे गेलेली नाही. त्यामुळे या दोन जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी करणारा अर्ज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आला होता. मात्र सोमवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने हे प्रकरण स्वतंत्रपणे न ऐकता, आगामी मुख्य सुनावणीदरम्यानच विचारात घेतले जाईल, असे सांगितले. यामुळे आता २१ आणि २२ जुलै रोजी होणाऱ्या सुनावणीकडे राज्याचे लक्ष लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाच्या टक्केवारीसंदर्भातील वाद न्यायालयात प्रलंबित असतानाच काही ठिकाणी निवडणुका पार पडल्या आहेत. त्या निवडणुका सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

---

### एम मोदींच्या काटकसरीच्या आवाहनानंतर महाराष्ट्र सरकारचा निर्णय

# अधिकाऱ्यांच्या 'कान्स' दौऱ्यावर बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांसह राज्य सरकारांनाही खर्चात काटकसर करण्याचे आवाहन केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने तातडीने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. सरकारी खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध घालण्यास सुरुवात करण्यात आली असून, यंदाच्या 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'साठी सरकारी प्रतिनिधी न पाठवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती, वाढते इंधनदर आणि जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी रविवारी देशाला संबोधित करताना इंधन बचतीवर भर दिला होता. नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा वापर मर्यादित ठेवावा, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य द्यावे आणि इलेक्ट्रिक वाहनांचा अधिक वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले होते. तसेच कंपन्यांनी शक्य असल्यास 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय द्यावा, अनावश्यक परदेश दौरे टाळावेत आणि एक वर्ष सोन्याची खरेदी टाळावी, असेही त्यांनी म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने प्रशासकीय स्तरावर काटकसरीची अंमलबजावणी सुरू केली आहे. सरकारी कामकाजासाठी आता प्रामुख्याने इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला जाणार आहे. तसेच मंगळवारपासून बहुतांश सरकारी बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे इंधन खर्चात बचत होण्यासोबतच परदेश दौरे आणि इतर प्रशासकीय खर्चांनाही आळा बसणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः फ्रान्समध्ये होणाऱ्या प्रतिष्ठित 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'साठी सरकारी प्रतिनिधी न पाठवण्याचा निर्णय हा सरकारच्या काटकसरीच्या धोरणाचा भाग मानला जात आहे.

आगामी काळात इतर विभागांच्या खर्चाचाही आढावा घेतला जाणार असून, अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आणखी काही निर्णय घेतले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

---

### व्हायरल प्रश्नसंचातील १०० हून अधिक प्रश्न परीक्षेशी मिळतेजुळते

# नीट पेपरफुटीचा संशय; लातूर कनेक्शनची चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जयपूर** : देशातील वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ३ मे रोजी झालेल्या परीक्षेपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या संभाव्य प्रश्नसंचातील अनेक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत आल्याचा धक्कादायक दावा समोर आला आहे. या प्रकरणी राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलाने चौकशी सुरू केली असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देखील प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रातील लातूरपर्यंत पोहोचल्याची चर्चा रंगली आहे.

राजस्थानचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विशाल बन्सल यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेच्या काही दिवस आधी सुमारे ४०० प्रश्नांचा एक संभाव्य प्रश्नसंच सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या संचातील जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांतील १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष नीट परीक्षेतील प्रश्नांशी तंतोतंत जुळत असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. हा प्रकार केवळ योगायोग आहे की यामागे मोठे रॅकेट कार्यरत आहे, याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. राजस्थानातील विविध शहरांसह डेहराडून येथेही चौकशी सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातील लातूरमधील एका नामांकित कोचिंग अकॅडमीचे काही व्हिडिओ आणि टेस्ट सिरीजचे पेपर्सही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणात 'लातूर कनेक्शन' असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी अद्याप स्थानिक स्तरावर कोणताही अधिकृत तपास सुरू नसल्याचे स्पष्ट केले आहे.

या प्रकरणामुळे देशभरातील विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही वर्षांत स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांमुळे परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे यंदाच्या नीट परीक्षेबाबतही संशय व्यक्त केला जात आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने प्रसिद्धीपत्रक जारी करत परीक्षा पूर्ण सुरक्षा प्रोटोकॉलनुसार पार पडल्याचा दावा केला आहे. संशयास्पद माहिती ७ मे रोजी उशिरा मिळाल्यानंतर ८ मे रोजी सकाळी ती स्वतंत्र पडताळणी आणि पुढील कारवाईसाठी केंद्रीय संस्थांकडे पाठवण्यात आल्याचे एनटीएने म्हटले आहे.

---

### घरगुती वीज ग्राहकांना मोठा दिलासा

**मुंबई** : घरगुती वीज ग्राहकांना पुढील पाच वर्षांत तब्बल २६ टक्क्यांनी तर उद्योग क्षेत्राला दरवर्षी २ - ३ टक्क्यांनी वीजदरात दिलासा मिळणार असल्याची मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. २०२५ ते २०३० या कालावधीसाठी राज्यात मल्टी इयर टॅरिफ मंजूर झाला असून, तो लागूही करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आता नव्या धोरणामुळे उद्योग क्षेत्रासाठी वीजदरात दरवर्षी घट होणार असून, त्यामुळे उद्योगांना मोठा दिलासा मिळेल. त्याचबरोबर घरगुती ग्राहकांनाही पुढील पाच वर्षांत २६ टक्क्यांपर्यंत दरकपातीचा फायदा मिळणार आहे.

---

# नाशिक टीसीएस प्रकरणी जेन झी लक्ष्य

### राष्ट्रीय महिला आयोगाच्या अहवालात कठोर निरीक्षणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रातील कथित लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणाने आता राष्ट्रीय पातळीवर गंभीर वळण घेतले असून राष्ट्रीय महिला आयोगाने या प्रकरणाबाबत अत्यंत कठोर निरीक्षणे नोंदवली आहेत. आयोगाने आपल्या अहवालात टीसीएस नाशिकमधील वातावरणाला "डीपली टॉक्सिक वर्कप्लेस" म्हणजेच अत्यंत विषारी कार्यसंस्कृती असे संबोधले आहे. विशेषतः 'जेन झी' महिला कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून त्यांचा मानसिक, धार्मिक आणि लैंगिक छळ करण्यात आल्याचा दावा आयोगाने केला आहे.

आयोगाच्या निष्कर्षांनुसार, काही महिला कर्मचाऱ्यांना हिंदू धर्माविषयी अवमानकारक वक्तव्ये ऐकावी लागत होती. धार्मिक भावना दुखावणे, विशिष्ट धार्मिक प्रथा स्वीकारण्याचा दबाव, उपवास आणि प्रार्थनांबाबत सक्ती, तसेच महिलांना मानसिकरीत्या वेगळे पाडण्याचे प्रकार घडल्याचे नमूद करण्यात आले आहे. पॉश कायद्याच्या अंमलबजावणीत त्रुटी असल्याचा ठपकाही आयोगाने ठेवला आहे.

या प्रकरणाची दखल घेत राष्ट्रीय महिला आयोगाने निवृत्त न्यायाधीश साधना जाधव यांच्या नेतृत्वाखाली विशेष तथ्यशोध समिती नाशिकमध्ये पाठवली होती. समितीने पीडित महिला, पोलीस अधिकारी, कंपनी प्रतिनिधी आणि इतर संबंधितांची भेट घेऊन माहिती संकलित केली.

या प्रकरणात आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल झाले असून काही कर्मचाऱ्यांना अटकही करण्यात आली आहे. कथित आरोपी निदा खान, आसिफ अन्सारी, रझा मेनन यांच्याबाबतही चौकशी वेगाने सुरू आहे. पोलिसांच्या तपासात लैंगिक छळ, मानसिक दबाव आणि धार्मिक प्रभाव टाकण्याच्या आरोपांची चौकशी केली जात आहे.

---

### उन्हाचे चटके वाढले; अवकाळी पावसाचाही फटका

# राज्यावर दुहेरी हवामान संकट कोसळणार...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : राज्यात सध्या हवामानातील तीव्र बदलामुळे नागरिकांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. एकीकडे तापमानाचा पारा झपाट्याने वाढत असून अनेक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट जाणवत आहे, तर दुसरीकडे कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. या बदलत्या वातावरणाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यासह शेतीवरही होत आहे.
राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. जळगाव येथे राज्यातील उच्चांकी ४२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अकोला आणि मालेगाव येथेही तापमान ४२ अंशांपर्यंत पोहोचले. त्यामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून, नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत.
मुंबई, ठाणे, पालघर, रायगड तसेच कोकण किनारपट्टीवरील भागांमध्ये उष्ण आणि दमट हवामानामुळे उकाड्यात अधिक वाढ झाली आहे. मुंबई शहर, नवी मुंबई आणि उपनगरांमध्ये वाढत्या उष्म्यामुळे नागरिक हैराण झाले असून, आरोग्य विभागाने उन्हात बाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.
विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि दीर्घकालीन आजार असलेल्या नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे. कोकणातील रत्नागिरीसह काही भागांत गेल्या तीन-चार दिवसांपासून अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे आंबा, काजू आणि नारळ बागांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांसमोर पुन्हा आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात, श्रीलंका परिसरात आणि आखाती भागात निर्माण झालेल्या चक्राकार वाऱ्यांच्या प्रभावामुळे राज्यात पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस कोकण, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने काही भागांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला असून, विजांच्या कडकडाटासह पावसाचा इशारा दिला आहे. बदलत्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---

# देशात इंधनाचा तुटवडा नाही; घाबरून साठेबाजी करू नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली असतानाच केंद्र सरकारने देशवासियांना मोठा दिलासा दिला आहे. भारताकडे पेट्रोलियम उत्पादनांचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाण्याची किंवा इंधनाची साठेबाजी करण्याची गरज नसल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे.

राजधानीतील कर्तव्य भवन येथे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम आशियातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी 'अनौपचारिक मंत्रीगटाची' पाचवी बैठक पार पडली. या बैठकीला जेपी नड्डा, हरदीप सिंह पुरी, अश्विनी वैष्णव आणि किरण रिजिजू यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री उपस्थित होते.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताची ऊर्जा सुरक्षा मजबूत आहे. देशाकडे कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा सुमारे ६० दिवसांचा, तर एलपीजीचा ४५ दिवसांचा 'रोलिंग स्टॉक' उपलब्ध आहे. "देशात कोणत्याही पेट्रोलियम उत्पादनाचा तुटवडा नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये," असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

भारताकडे सध्या सुमारे ७०३ अब्ज डॉलर्सचा परकीय चलन साठा आहे. तसेच भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल शुद्धीकरण करणारा देश असून १५० हून अधिक देशांना इंधन निर्यात करणारा चौथा मोठा देश आहे.

## संपादकीय

# द्रविडी राजकारणाचा आर्थिक अंतर्विरोध




**तमिळनाडूच्या झगमगत्या द्रविडी मॉडेलच्या आड कर्जाचा भीषण डोंगर उभा राहिला असून, राज्याची अर्थव्यवस्था आता व्हेंटिलेटरवर पोहोचली आहे. अभिनेता विजयने आकडेवारीनिशी सत्ताधाऱ्यांच्या रेवडी संस्कृतीवर प्रहार केल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. आता केवळ अस्मितेवर नव्हे, तर तिजोरीच्या 'बॅलन्स शीट'वर तमिळनाडूचा भविष्यातील कौल ठरणार आहे.**

तमिळनाडूच्या राजकारणात सध्या 'द्रविडी मॉडेल'च्या यशाच्या ज्या गप्पा मारल्या जात आहेत, त्या झगमगत्या पडद्याआड राज्याच्या आर्थिक आरोग्याचे जे विदारक चित्र दडले आहे, ते आता 'बॅलन्स शीट'च्या माध्यमातून चव्हाट्यावर येऊ लागले आहे. कोणत्याही राज्याचा विकास हा केवळ घोषणा आणि मोफतच्या योजनांवर मोजला जात नाही, तर तो त्या राज्याच्या तिजोरीतील शिस्तीवर अवलंबून असतो; मात्र दुर्दैवाने तमिळनाडूमध्ये लोकानुनय आणि मतपेढीच्या राजकारणाने अर्थशास्त्राचा पूर्णपणे गळा घोटल्याचे स्पष्ट दिसत आहे. राज्याचा कर्जाचा डोलारा आज ८.५ लाख कोटी रुपयांच्या पार गेला असून, ही आकडेवारी तमिळ जनतेच्या पुढच्या पिढ्यांच्या भविष्यावर ओढलेले संकट आहे. जेव्हा राज्याच्या एकूण उत्पन्नाचा मोठा हिस्सा केवळ जुन्या कर्जाचे व्याज फेडण्यातच खर्ची पडतो, तेव्हा तो प्रगतीचा नव्हे तर आर्थिक दिवाळखोरीचा मार्ग असतो. मोफत मिक्सर, ग्राइंडरपासून ते आताच्या रोख रकमेच्या वाटपापर्यंतचा प्रवास हा सत्तेच्या सोपानासाठी सुसह्य वाटत असला, तरी त्याचे पर्यवसान राज्याला 'आर्थिक अराजकता' आणि कर्जाच्या खाईत लोटण्यात झाले आहे. तमिळनाडूच्या आर्थिक इतिहासावर नजर टाकली तर असे लक्षात येते की, मागील एका दशकात राज्याच्या कर्जात झालेली वाढ ही चक्रवाढ व्याजासारखी भयानक आहे. २०११ मध्ये जे कर्ज १ लाख कोटींच्या आसपास होते, ते आज नऊ पटीने वाढले आहे. विशेषतः २०२१ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर सत्तेवर आलेल्या सरकारने ज्या 'मोफत' घोषणांचा पाऊस पाडला, त्याने तिजोरीचा तळ दाखवण्यास सुरुवात केली आहे. याचा थेट परिणाम राज्याच्या पायाभूत सुविधांवर आणि औद्योगिक विकासावर होत आहे. उद्योगांना आकर्षित करण्याच्या बाबतीत तमिळनाडू एकेकाळी देशात आघाडीवर होते, मात्र वाढती महसुली तुट आणि वीज दरवाढीमुळे आता येथील मध्यम आणि लघु उद्योग शेजारील राज्यांकडे धाव घेऊ लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर विजयने ज्या पद्धतीने आकडेवारीनिशी सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवला आहे, तो द्रविडी राजकारणातील एक महत्त्वाचा 'क्लायमॅक्स' म्हणावा लागेल. सत्ताधारी सरकारने मांडलेल्या 'कल्याणकारी' योजनांच्या बुरख्याखाली भ्रष्टाचाराची आणि प्रशासकीय दिरंगाईची वाळवी राज्याच्या अर्थव्यवस्थेला कशी पोखरत आहे, हे आता लपून राहिलेले नाही. राज्याच्या महसुली तुटीचा आकडा जेव्हा ५०,००० कोटी रुपयांची मर्यादा ओलांडतो, तेव्हा त्या राज्याची अवस्था श्रीलंकेसारखी होण्यास वेळ लागत नाही. भांडवली गुंतवणूक आणि उद्योगांना पोषक वातावरण देण्याऐवजी केवळ सवलतींची खैरात वाटणे हे दीर्घकालीन हिताचे नसते. तमिळनाडूची तरुण पिढी आता आपल्या राज्याच्या आर्थिक स्थितीवर प्रश्न विचारू लागली आहे. विजयने मांडलेले 'डेट-टू-जीएसडीपी' गुणोत्तराचे मुद्दे हे सिद्ध करतात की, आता राजकारणाची दिशा अस्मितेकडून जबाबदारीकडे वळत आहे. दक्षिण भारताच्या राजकारणात 'द्रविडी अस्मिता' हा नेहमीच कळीचा मुद्दा राहिला आहे, मात्र आता या अस्मितेची जागा 'आर्थिक सुरक्षा' घेऊ पाहत आहे. जर राज्याची तिजोरी रिकामी असेल, तर स्वाभिमानाच्या गप्पा मारणे पोकळ ठरते. केंद्राकडून मिळणाऱ्या निधीवर आणि जीएसटीच्या वाटपावर सतत कुरकूर करणाऱ्या राज्यांनी स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत का आटत आहेत, याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. तमिळनाडूमध्ये आज प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर लाखांच्या घरात कर्ज आहे. हे कर्ज फेडण्यासाठी पुन्हा कर्ज काढण्याची जी साखळी निर्माण झाली आहे, ती राज्याला आर्थिक गुलामगिरीकडे नेणारी आहे. प्रस्थापित पक्षांच्या 'कौटुंबिक' राजकारणाने राज्याच्या संसाधनांची जी लूट केली आहे, तिला चाप लावल्याशिवाय आर्थिक स्थिती सुधारणार नाही. विजयचा हा राजकीय प्रवेश जर खरोखरच या आर्थिक व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी असेल, तर तमिळनाडूच्या राजकारणात एका नव्या युगाची सुरुवात होऊ शकते. अन्यथा, भविष्यातील पिढ्या या प्रस्थापित मॉडेलला केवळ एका आर्थिक आपत्तीच्या रूपातच लक्षात ठेवतील. स्वाभिमान हा केवळ शब्दांत नसून तो राज्याच्या आर्थिक संपन्नतेत असावा लागतो, हेच तमिळनाडूच्या सद्यस्थितीवरून स्पष्ट होते.

# अडथळ्यांची शर्यत आणि कृषी निर्यातीचा अश्वमेध

**» ट्रम्प प्रशासनाने लादलेल्या जाचक आयात शुल्काच्या अडथळ्यांनंतरही भारताच्या कृषी निर्यातीने घेतलेली भरारी थक्क करणारी आहे. भारतीय शेतमालाने आपली गुणवत्ता आणि विश्वासार्हता सिद्ध केली आहे.**



जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये जेव्हा जेव्हा संरक्षणवादाचे वारे वाहू लागतात, तेव्हा त्याचा पहिला फटका विकसनशील देशांच्या निर्यातीला बसतो, असा आजवरचा अनुभव आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणांतर्गत आयात शुल्काची जी तटबंदी उभारली, त्यामागे भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेला रोखण्याचा सुप्त हेतू होता, हे आता लपून राहिलेले नाही. मात्र, या सर्व जाचक अटी आणि आर्थिक अडथळ्यांची शर्यत पार करत भारतीय कृषी निर्यातीने २०२५-२६ या वर्षात जी कामगिरी केली आहे, ती केवळ कौतुकास्पद नसून भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे दर्शन घडवणारी आहे. अमेरिकेने लादलेल्या दंडात्मक करांच्या सावलीतही भारतीय शेतमालाची निर्यात घटण्याऐवजी वाढत जाणे, हे जागतिक व्यापारातील एका नव्या पर्वाचे निदर्शक आहे.

या यशाचे सर्वात मोठे कारण म्हणजे भारतीय शेतमालाची 'अनन्यता'. बासमती तांदूळ, मसाले आणि सागरी उत्पादने या तीन क्षेत्रांत भारताचे जे वर्चस्व आहे, त्याला पर्याय शोधणे अमेरिकेलाही अशक्य झाले आहे. ट्रम्प प्रशासनाने कितीही कर लादले, तरी अमेरिकेतील ग्राहकांना भारतीय मसाल्यांची आणि सुगंधी बासमतीची सवय झाली आहे. जेव्हा एखादे उत्पादन जागतिक पुरवठा साखळीचा अविभाज्य भाग बनते, तेव्हा त्यावर लादलेले आयात शुल्क हे शेवटी आयात करणाऱ्या देशातील ग्राहकांच्याच खिशातून जाते. भारताने याच ताकदीचा वापर करून अमेरिकेच्या बाजारपेठेत आपली जागा टिकवून ठेवली आहे. केवळ तांदूळच नव्हे, तर फळे, भाजीपाला आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या बाबतीतही भारताने गुणवत्तेचे जे निकष पाळले आहेत, त्यामुळेच जागतिक बाजारपेठेत भारताचा 'ब्रँड' मजबूत झाला आहे.

दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे भारताने अवलंबलेले बाजारपेठेतील विविधीकरण. आपण केवळ अमेरिकेच्या बाजारपेठेवर विसंबून न राहता युरोप, आग्नेय आशिया आणि विशेषतः आखाती देशांमध्ये आपल्या निर्यातीचे जाळे विस्तारले आहे. 'एकेरी अवलंबित्व' हे व्यापारातील सर्वात मोठे संकट असते, हे ओळखून भारताने नवीन बाजारपेठा शोधण्यावर भर दिला. जेव्हा अमेरिकेने आयात शुल्काचा बडगा उगारला, तेव्हा भारताने आपल्या निर्यातीचा ओघ अशा देशांकडे वळवला जिथे भारतीय शेतमालाची मागणी प्रचंड आहे. रशिया-युक्रेन संघर्षानंतर जागतिक स्तरावर निर्माण झालेली अन्नाची टंचाई भारतासाठी एक संधी ठरली आणि आपण 'जगाचे अन्न कोठार' म्हणून आपली प्रतिमा यशस्वीपणे समोर आणली.

या प्रक्रियेत केंद्र सरकारच्या धोरणात्मक पाठिंब्याचे योगदानही मोलाचे आहे. निर्यातीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा, शीतगृहांचे जाळे आणि लॉजिस्टिक्समधील सुधारणांमुळे शेतमाल शेतातून थेट परदेशी बाजारपेठेपर्यंत कमी वेळेत पोहोचू लागला आहे. 'अॅग्री-एक्सपोर्ट झोन'च्या माध्यमातून विशिष्ट उत्पादनांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्ही सुधारली.

ट्रम्प यांचे शुल्क हे केवळ राजकीय दबावतंत्र होते, मात्र अर्थशास्त्राचे नियम हे राजकारणापेक्षा प्रबळ असतात. अमेरिकेला आपल्या अन्नसुरक्षेसाठी आणि महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी भारतीय शेतमालाची गरज आहे, हेच या वाढत्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. भारतीय शेतकरी आता केवळ पारंपरिक शेतीवर अवलंबून न राहता जागतिक बाजारपेठेच्या मागणीनुसार पिकांचे नियोजन करू लागला आहे. सेंद्रिय उत्पादने आणि पौष्टिक तृणधान्ये यांच्या निर्यातीत झालेली वाढ हे याचे उत्तम उदाहरण आहे. संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेल्या 'मिलेट्स' वर्षानंतर भारताने या क्षेत्रात जागतिक नेतृत्व स्वीकारले आहे. हा विजय केवळ आर्थिक आकडेवारीचा नसून तो भारतीय शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि देशाच्या धोरणात्मक स्वावलंबनाचा आहे.

संरक्षणवादाचा हा काळ भारतासाठी एक चाचणी होती आणि आपण ती यशस्वीपणे पार केली आहे. आगामी काळात जागतिक व्यापार अधिक क्लिष्ट होण्याची शक्यता असली, तरी भारताने 'आत्मनिर्भरता' आणि 'जागतिक विस्तार' यांचा जो समतोल साधला आहे, तो आपल्याला नक्कीच फायदेशीर ठरेल. ट्रम्प यांच्या आयात शुल्काने भारताची प्रगती रोखण्याऐवजी आपल्याला अधिक सक्षम आणि विविधांगी बनवले आहे. भारताची कृषी निर्यात ही आता केवळ व्यवहाराचा भाग राहिलेली नाही, तर ती भारताच्या 'सॉफ्ट पॉवर'चे एक प्रभावी शस्त्र बनली आहे. ज्याप्रमाणे आपण माहिती तंत्रज्ञानात जगाला दिशा दिली, त्याचप्रमाणे आता कृषी क्षेत्रातही भारत जागतिक नकाशावर ध्रुवचांदणीसारखा चमकत आहे, हेच या वाढत्या निर्यातीचे खरे गमक आहे.

# शहरातील २४ हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड खंडित

## एसटीपी प्रकल्पांकडे केलेले दुर्लक्ष भोवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्या आणि आस्थापनांसाठी मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी) कार्यान्वित करून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक असतानाही अनेक सोसायट्यांकडून नियमांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे समोर आले आहे. वारंवार नोटिसा देऊनही एसटीपी सुरू न करणाऱ्या २४ हाऊसिंग सोसायट्यांचे नळजोड पालिकेकडून तोडण्यात आले असून, ही कारवाई पुढेही सुरू राहणार आहे.

महानगरपालिका प्रशासनाकडून शहरात मैलासांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. शहरात सध्या १०६ एमएलडी क्षमतेची एकूण ४९४ खासगी एसटीपी केंद्रे आहेत. त्यापैकी ८३ एमएलडी क्षमतेची ३६९ केंद्रे कार्यान्वित असून, २३ एमएलडी क्षमतेची १२५ केंद्रे अद्याप बंद असल्याचे निदर्शनास आले आहे. महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत संबंधित सोसायट्यांना तांत्रिक सहाय्य आणि मार्गदर्शन दिले जात आहे. एसटीपी सुरू करण्यासाठी १२५ पैकी ९९ सोसायट्यांना तीन वेळा नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तरीही आवश्यक कार्यवाही न झाल्याने महापालिकेने विशेष तपासणी मोहीम राबवून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोसायट्यांवर दंडात्मक कारवाई सुरू केली.

पहिल्या टप्प्यात एसटीपी बंद असलेल्या ६२ सोसायट्यांपैकी २४ सोसायट्यांचे नळजोड खंडित करण्यात आले आहेत. चार सोसायट्यांनी एसटीपी सुरू करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, तीन ठिकाणी एसटीपी कार्यरत असल्याचे आढळल्याने त्यांचे नळजोड तोडण्यात आले नाहीत. तर काही ठिकाणी बांधकाम व्यावसायिकांकडून एसटीपी सोसायट्यांकडे हस्तांतरित न झाल्याने संबंधित बिल्डरांवर उपद्रव शोध पथकाद्वारे कारवाई करण्यात येत आहे.

नळजोड तोडण्यात आलेल्या सोसायट्यांमध्ये आकुर्डीतील ऐश्वर्यम हमारा, उद्योगनगर, चिंचवडमधील पलास रिदम, रावेतमधील सक्सेस इन्फा सोसायटी, आनंदबन हाऊसिंग सोसायटी, साई सरोज, आदित्य मल्हार, रेन्बो विस्टा, मंगल विश्व, मोशीतील जी. के. पॅलासिओ फेज-२, चिखलीतील शुभ कलश सोसायटी, जयहिंद रेसिडन्सी, वाकडमधील सिल्व्हर स्कायस्केप, सोनिगरा केशर, पुनावळेतील जी. के. रोज मॅनसेन, वर्धमान प्लॉम रोज, ताथवडेतील अझुरे म्हाडा, मिलेनियम अॅक्रोपोलिस, पिंपळे सौदागरमधील अलकेव्ह सोसायटी, रोज आयकॉन, रहाटणीतील रॉयल एलिजन्स, साई क्रिस्टल आणि पिंपळे गुरव येथील ओरियाना सोसायटींचा समावेश आहे.

महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले की, "शहरातील जलसंपत्तीचे संवर्धन आणि नदीप्रदूषण रोखण्यासाठी एसटीपी केंद्रे नियमित सुरू ठेवणे अत्यावश्यक आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केल्यास पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील." महापालिकेच्या तपासणीत काही सोसायट्यांकडून सांडपाणी थेट नाल्यात, स्टॉर्म वॉटर लाईनमध्ये किंवा ड्रेनेज लाईनमध्ये सोडण्यात येत असल्याचेही आढळून आले आहे. त्यामुळे नदीप्रदूषण वाढत असून पर्यावरणावर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# भाजपमध्ये संघटनेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** "राजकारणात काम करत असताना पक्ष संघटना ही नेहमी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा मोठी असते. प्रत्येक कार्यकर्त्याने ही भावना मनाशी पक्की बाळगली पाहिजे, कारण भारतीय जनता पार्टीमध्ये संघटनेपेक्षा श्रेष्ठ या जगात कोणीही नाही," असे प्रतिपादन भाजपचे नवनियुक्त शहर प्रभारी अॅड. श्री भरतजी पाटील यांनी केले.

मोरवाडी येथील पक्ष कार्यालयात आयोजित पिंपरी-चिंचवड शहराच्या संघटनात्मक आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अॅड. भरतजी पाटील यांची शहर प्रभारीपदी नियुक्ती केल्यानंतर आगामी पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

या बैठकीला शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस अॅड. मोरेश्वर शेडगे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडये, युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, दिनेश यादव यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, आघाड्या, सेल, प्रकोष्ठ आणि मंडल अध्यक्ष-सरचिटणीस मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पावसाळ्यापूर्वीच नाले तुंबले; पूराचा धोका वाढला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शहरातील प्रमुख नाले आणि उपनाले मोठ्या प्रमाणात तुंबलेल्या अवस्थेत असल्याचे वास्तव समोर आले आहे. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, टाकण्यात येणारा कचरा, राडारोडा, चिखल आणि वाढलेली झुडपे यामुळे अनेक ठिकाणी पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण न झाल्यास शहरातील अनेक भागांत पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शहरातील मुख्य नाले तसेच स्ट्रॉम वॉटर निचऱ्यासाठी असलेल्या उपनाल्यांची क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अनेक भागांमध्ये




नाल्यांच्या कडेला काढलेला गाळ आणि राडारोडा दिवसेंदिवस तसाच पडून असल्याचे चित्र दिसून येत आहे. मुसळधार पावसात हा गाळ पुन्हा नाल्यात वाहून जाऊन परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

उपनगरे, एमआयडीसी परिसर आणि निवासी भागांमधील नाल्यांची अवस्था चिंताजनक बनली असून, पावसाचे पाणी थेट रस्ते, हाऊसिंग सोसायट्या आणि व्यापारी आस्थापनांमध्ये शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. एका बाजूला 'स्मार्ट सिटी'चे स्वप्न दाखवले जात असताना दुसऱ्या बाजूला शहरातील नालेच गुदमरल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे अनेक नाल्यांच्या परिसरात उद्याने आणि पादचारी मार्ग विकसित करण्यात आले आहेत. मात्र, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना अत्यंत अपुऱ्या असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी नाल्यांच्या वळणावरील कठडे तुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नसल्याने वाहनचालक, शतपावलीसाठी येणारे ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी हे नाले धोकादायक ठरत आहेत. याशिवाय काही नाल्यांच्या कडेलाच विद्युत खांब उभे करण्यात आले आहेत. मुसळधार पावसात नाले तुडुंब भरल्यास पाणी विद्युत यंत्रणेला स्पर्श होऊन विजेचा प्रवाह उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पाण्यातून मार्ग काढणाऱ्या नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो.

नागरिकांनी महापालिकेकडे तातडीने नालेसफाई पूर्ण करण्याची, नाल्यांलगतचे कठडे दुरुस्त करण्याची आणि धोकादायक ठिकाणी सुरक्षाव्यवस्था उभारण्याची मागणी केली आहे.

# जादा परताव्याचे आमिष दाखवत महिलेची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चिंचवड परिसरात गुंतवणुकीवर जादा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेची ५ लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी निगडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार २१ ऑगस्ट २०२४ ते १२ मार्च २०२५ या कालावधीत गणेश कॉम्प्लेक्स, सिद्धीविनायक मंदिराशेजारी, रसरंग रोड, संभाजीनगर, चिंचवड येथे घडला. याप्रकरणी एका महिलेने फिर्याद दिली असून विनोद चौहान (रा. चंदीगड, पंजाब




– पूर्ण पत्ता उपलब्ध नाही) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

तक्रारीनुसार, आरोपीने गुंतवणुकीवर अधिक परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर वेळोवेळी ५ लाख १० हजार रुपये घेतले. मात्र, गुंतवणुकीवरील परतावा तसेच मूळ रक्कमही परत न करता आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३१६(२) आणि ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भिंगारदिवे करीत आहेत.

### तरुणाला जीवे मारण्याची धमकी

**पुणे :** जुनी सांगवी परिसरात एका तरुणाला पिस्तूलाचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार ८ मे रोजी रात्री ९ ते १० वाजण्याच्या सुमारास दत्त आश्रम रोडवरील नवीन पुलाजवळ घडला. याप्रकरणी अनिकेत देवेंद्र गायकवाड (वय २४, रा. जुनी सांगवी) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी आपल्या मित्रांसोबत गप्पा मारत बसले असताना दोन विधीसंघर्षित मुलांसह अन्य दोघेजण दुचाकीवरून तेथे आले. आरोपींपैकी एकाने कमरेला लावलेले पिस्तूल काढून ते फिर्यादीकडे रोखले. "तू अमोल भोसलेसोबत फिरतोस, आज तुला संपवतो," अशी धमकी देत आरोपींनी शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, आर्म अॅक्ट कलम ३(२५), तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५ आणि क्रिमिनल लॉ अमेंडमेंट अॅक्ट कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भालेराव करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून तरुणावर हल्ला

**पिंपरी :** किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर हल्ला करून दुचाकी आणि घराच्या दरवाजाची तोडफोड केल्याची घटना पिंपरीतील बौद्धनगर परिसरात घडली. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाणे येथे तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना गुरुवारी (दि. ८ मे) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास बौद्धनगर येथील १२ नंबर बिल्डिंग परिसरात घडली. याप्रकरणी नागेश अशोक घायटडक (वय ३०, रा. बौद्धनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक लोखंडे, यश रोकडे आणि नौरेज शेख (रा. एमआयडीसी, पिंपरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार आहे. फिर्यादी यांच्या भावाकडे पाहण्याच्या कारणावरून आरोपींनी वाद घालत संतोष घायटडक यांच्या दुचाकीवर दगड मारून तोडफोड केली. तसेच फिर्यादीच्या खोलीच्या पत्र्याच्या दरवाजावर सिमेंटचा ब्लॉक मारून नुकसान केले. यानंतर आरोपींनी नागेश घायटडक यांच्यावर सिमेंटचा ब्लॉक फेकून मारहाण केली.

# अल्पवयीनांकडून देशी पिस्तूल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** दापोडी परिसरात कारवाई करत पिंपरी-चिंचवड पोलीस यांनी दोन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेत त्यांच्या कब्जातून देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल, मॅगझिन आणि दोन जिवंत काडतुसे जप्त केली. याप्रकरणी दापोडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास काटे लॉन्सजवळील मोकळ्या जागेत ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी नितीन सुरेश संकुनहे यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी अल्पवयीनांकडे कोणताही कायदेशीर परवाना नसताना सुमारे ६० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे लोखंडी पिस्तूल, मॅगझिन आणि दोन जिवंत काडतुसे आढळून आली.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रात लागू असलेल्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही अल्पवयीनांना ताब्यात घेऊन त्यांना बालन्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपास दापोडी पोलीस करीत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### कांदा काढणी दरम्यान महिलेचा मृत्यू



**मंचर :** आंबेगाव तालुक्यात उष्माघाताचा संशयित पहिला बळी गेल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सायंकाळी समोर आली. शेतात कांदा काढणीचे काम करत असताना एका महिलेचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नकुशा बाळू सुपे (वय ३३) या मूळच्या वाडा-सुपेवाडी येथील रहिवासी होत्या. त्या कांदा काढणीच्या कामासाठी आमोंडी येथे आल्या होत्या. दुपारच्या कडक उन्हात काम सुरू असताना त्यांना अचानक चक्कर आली आणि त्या शेतातच कोसळल्या. सोबतच्या कामगारांनी त्यांना तातडीने शिनोली येथील खासगी दवाखान्यात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी घोडेगाव ग्रामीण रुग्णालय येथे हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आला असून अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. या घटनेमुळे सुपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### अभिनव विद्यालयाचा निकाल ९८.५९ टक्के

**रांजणगाव गणपती :** अभिनव विद्यालय यांचा झालेल्या एसएससी परीक्षेचा निकाल ९८.५९ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्ता मिळवत विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत वेदांत बापू घावटे याने ८९ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. ऋतुजा अरविंद सरोदे हिने ८८.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर अभिजित विनोद गिऱ्हे याने ८७.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

## सहकारी साखर उद्योगातून चिंतेचा सूर

# एफआरपी वाढली, पण एमएसपी स्थिर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** केंद्र शासनाने २०२६-२७ च्या गळीत हंगामासाठी १०.२५ टक्के साखर उताऱ्यासाठी प्रतिटन ३६५० रुपये आणि त्यापुढील प्रत्येक टक्क्यासाठी ३६५ रुपये असा रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी) जाहीर केला आहे. मात्र, गेल्या सात वर्षांपासून साखरेच्या किमान विक्री किमतीत (एमएसपी) कोणतीही भरीव वाढ न झाल्याने सहकारी साखर उद्योगात चिंता व्यक्त केली जात आहे. साखर कारखान्यांचे अर्थकारण टिकवण्यासाठी एमएसपीमध्ये तातडीने वाढ करण्याची मागणी उद्योग क्षेत्रातून जोर धरत आहे.




केंद्र शासनाने २०१९ मध्ये साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ करून तो २९०० रुपयांवरून ३१०० रुपये प्रतिक्विंटल केला होता. मात्र त्यानंतर आजतागायत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. दुसरीकडे एफआरपीमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने साखर उद्योगावरील आर्थिक ताण वाढत चालला आहे. २००९-१० मध्ये ९.५ टक्के उताऱ्यासाठी प्रतिटन १२९८ रुपये एफआरपी होती. त्याचवेळी साखरेचा एमएसपी २५९६ रुपये प्रतिक्विंटल होता.

आता २०२६-२७ साठी एफआरपी ३६५० रुपयांपर्यंत पोहोचली असून मागील १७ वर्षांत एफआरपीमध्ये प्रतिटन २३५२ रुपयांची वाढ झाली आहे. मात्र, या कालावधीत एमएसपीमध्ये केवळ ५०४ रुपयांची वाढ झाली असून तो अजूनही ३१०० रुपयांवरच स्थिर आहे. त्यामुळे एफआरपीच्या तुलनेत एमएसपी वाढ अत्यंत कमी असल्याचे उद्योग क्षेत्राचे म्हणणे आहे. सध्याच्या परिस्थितीत एमएसपीपेक्षा एफआरपी तब्बल ५५० रुपयांनी अधिक असल्याने साखर कारखान्यांचे आर्थिक गणित बिघडत असल्याचे सांगितले जात आहे.

ऊस उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ न झाल्याने कारखान्यांवरील ताण वाढत आहे. केंद्र शासनाने यंदाची एफआरपी निश्चित करताना उसाचा प्रतिटन उत्पादन खर्च १८२० रुपये गृहीत धरला आहे. मात्र खत, मजुरी, वीज, सिंचन आणि वाहतूक खर्चात झालेल्या वाढीमुळे प्रत्यक्ष उत्पादन खर्च यापेक्षा अधिक असल्याचे साखर उद्योगाचे मत आहे.

मागील दोन-तीन वर्षांपासून साखरेचे बाजारभाव एमएसपीच्या आसपासच राहिले आहेत. हंगामाच्या सुरुवातीला असलेले दर वर्षभर स्थिर राहत नसल्याने साखर कारखान्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांना एफआरपी देण्यावर होत असून अनेक कारखान्यांना ऊस उत्पादकांची थकबाकी चुकती करणेही कठीण बनत असल्याची भावना उद्योगातून व्यक्त केली जात आहे.

## उष्णतेचा डिंभे धरणाच्या पाणीसाठ्यावर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** वाढते तापमान आणि उन्हाळी आवर्तनामुळे आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणाच्या पाणीसाठ्यात दिवसेंदिवस घट होत असल्याचे चित्र समोर आले आहे. सध्या धरणात २०.८१ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून, गतवर्षी याच कालावधीत हा साठा १०.९८ टक्के होता. यंदा तुलनेने पाणीसाठा अधिक असला तरी वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याने धरणातील पाणी कमी होत चालले आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतीसाठी पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खरीपपूर्व पिके आणि भाजीपाला वाचवण्यासाठी अनेक भागांतील शेतकरी धडपड करत आहेत. भविष्यात पाण्याची उपलब्धता कमी झाल्यास जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




आहे. शेतीला दिलासा देण्यासाठी डाव्या कालव्यातून सुमारे ६०० क्यूसेक पाणी सोडण्यात आले आहे. मात्र उपलब्ध पाणीसाठा मर्यादित असल्याने त्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असल्याचे जलसंपदाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांना पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले आहे. कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर वाढवण्यावर भर देण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. आगामी काळात पावसाळा लांबल्यास पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## नागापूर परिसरातील बिबट्या जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** गेल्या दोन-तीन महिन्यांपासून आंबेगाव तालुक्यातील नागापूर – वळती फाटा परिसरात दहशत माजवणारा बिबट्या अखेर सोमवारी (दि. ११) पहाटेच्या सुमारास येथील सूर्यकांत भिकाजी दळे यांच्या सामायिक विहिरीत पडला. वनविभागाच्या रेस्क्यू टीमने स्थानिकांच्या मदतीने त्याला सुरक्षितरित्या बाहेर काढून जीवदान दिले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.



नागापूर गावातील ढोले मळा व वळती फाटा परिसरात गेल्या दोन-तीन महिन्यांपासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू होता. रात्रीच्या वेळी रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या दुचाकीस्वारांवर तो झेप घेण्याचा प्रयत्न करत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वनविभागाने या परिसरात पिंजरे लावले होते; मात्र बिबट्या सतत वनविभागाला हुलकावणी देत होता. दरम्यान, सोमवारी पहाटे शिकारीचा पाठलाग करताना हा बिबट्या वळती फाटा परिसरातील सूर्यकांत भिकाजी दळे यांच्या सामायिक विहिरीत पडला.

सकाळी विहिरीजवळ राहणारे शेतमजूर गणेश तळपे हे उठल्यानंतर त्यांना विहिरीतून पाण्याचा आवाज आला. त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता आत बिबट्या असल्याचे दिसून आले. त्यांनी तात्काळ शेतमालक डॉ. संजय भोर यांना याची माहिती दिली. त्यानंतर डॉ. भोर यांनी नागापूर गावचे पोलीस पाटील संजय पोहकर यांना घटनेची खबर दिली. घटनेची माहिती मिळताच मंचर विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले, वनपाल आर. एम. फुलमाळी, वनरक्षक बालाजी पोतरे तसेच रेस्क्यू टीम सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी दोरांच्या सहाय्याने पिंजरा विहिरीत सोडला. काही वेळाने बिबट्या पिंजऱ्यात शिरला. त्यानंतर रेस्क्यू टीमने पिंजरा सुरक्षितपणे बाहेर काढला.

बिबट मादी अंदाजे दीड ते दोन वर्षे वयोगटातील असल्याचे वनविभागाने सांगितले. तिला प्राथमिक उपचारासाठी अवसरी वन उद्यान येथे नेण्यात आले असून पुढील काळात माणिकडोह बिबट निवारण केंद्र येथे हलवण्यात येणार आहे.

## जुन्नर लोकन्यायालयात विक्रमी निपटारा

### २ कोटी ९० लाख ६० हजार २५८ रुपयांची वसुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे आणि तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि. ९ मे) रोजी जुन्नर न्यायालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले. या लोकन्यायालयात विक्रमी ३६ हजार २३९ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. तसेच प्रलंबित आणि दाखलपूर्व प्रकरणांतून एकूण २ कोटी ९० लाख ६० हजार २५८ रुपयांची वसुली करण्यात आली.




या लोकन्यायालयाचे उद्घाटन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. बी. शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. "न्याय आपल्या दारी" या संकल्पनेनुसार विधी सेवा प्राधिकरण नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. पक्षकारांनी लोकन्यायालयाच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे निकाली काढून वेळ आणि पैशाची बचत करावी, असे आवाहन यावेळी शेलार यांनी केले.

या लोकन्यायालयात दिवाणी दावे, फौजदारी दावे, बँक वसुली प्रकरणे, ग्रामपंचायत, महावितरण, पतसंस्था तसेच फायनान्स कंपन्यांची प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. दिवसभर चाललेल्या कामकाजात दोन पॅनलद्वारे दोन्ही बाजूंच्या पक्षकारांचे म्हणणे ऐकून समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यातून ३६ हजार २३९ प्रकरणे आपसी समजोत्याने निकाली काढण्यात आली.

लोकन्यायालय पॅनल प्रमुख एस. बी. शेलार, दिवाणी न्यायाधीश एस. एस. जैन, जुन्नर वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष हेमंत हडवळे, उपाध्यक्ष निलीमा शेरकर, सचिव पुराणिक नलावडे, पॅनल सदस्य प्रविण मदगुळे, श्वेता पवार, समर्थ लॉ कॉलेजचे स्वयंसेवक विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते. लोकन्यायालय यशस्वी करण्यासाठी जुन्नर वकील बार, पोलीस अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, पंचायत समिती जुन्नर, बँका, ग्रामपंचायती, महावितरण, पतसंस्था, फायनान्स कंपन्या आणि पक्षकार यांचे सहकार्य लाभल्याचे आयोजकांनी सांगितले.

## भीषण आगीत दोन कुटुंबांचे मोठे नुकसान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** लांडेवाडी येथील डोंगर परिसरात लागलेल्या भीषण आगीत दोन कुटुंबांचे मोठे नुकसान झाले. शनिवारी (दि. ९) दुपारी घडलेल्या या घटनेत दोन महिलांच्या प्रसंगावधानामुळे दोन चिमुकल्यांचे प्राण वाचल्याने मोठी दुर्घटना टळली.

दर्यावस्ती परिसरातील गुलाब वसंत केवाळे यांच्या गोठ्याला आग लागून जनावरांचा चारा, शेतीसाठी लागणारे साहित्य आणि घरगुती वस्तू जळून खाक झाल्या. तसेच सागर दादाभाऊ केदारी यांच्या झोपडीतील संसारोपयोगी साहित्यही आगीत भस्मसात झाले.

आग लागली तेव्हा झोपडीत माही सागर केदारी (वय ८ महिने) आणि शिवांश गुलाब केवाळे (वय १० महिने) ही दोन लहान मुले होती. मात्र, महिलांनी तत्परता दाखवत धाव घेत दोन्ही बालकांना सुरक्षित बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच खंडेराव आढळराव, अभिजित आढळराव पाटील, प्रदीप आढळराव पाटील, सोमनाथ आढळराव पाटील, अविनाश आढळराव पाटील आणि वनमजूर रामभाऊ उभे यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. आगीनंतर संबंधित कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या कुटुंबासाठी मदतकार्य हाती घेण्यात येणार आहे.

## न्यू इंग्लिश स्कूल खामुंडीचे घवघवीत यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळेफाटा :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये न्यू इंग्लिश स्कुल खामुंडी यांनी पुन्हा एकदा १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीतही उल्लेखनीय कामगिरी केली असून अनेक विद्यार्थी विशेष प्राविण्य व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. परीक्षेत समृद्धी गणेश शिंगोटे हिने प्रथम क्रमांक पटकावला. सार्थक उत्तम गंभीर द्वितीय, अलिशान परवेज मोमीन तृतीय, कावेरी पुराणिक नलावडे चतुर्थ, तर रिया रवींद्र शिंदे हिने पाचवा क्रमांक मिळविला. याबाबत शाळेचे मुख्याध्यापक बाळू बांगर तसेच शिक्षक सुवर्णा नांगरे, सुनीता वर्पे, राजेंद्र शिंदे आणि संजय आहेर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. "हा निकाल विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शाळा नेहमीच कटिबद्ध राहिली असून पुढेही हा वारसा कायम राखला जाईल," असे त्यांनी सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थाचालक, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांनी एकमेकांना पेढे भरवत आनंद साजरा केला. गावकऱ्यांनीही समाधान व्यक्त केले.

## इंद्रायणी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** तीर्थक्षेत्र देहूगावातील पवित्र इंद्रायणी नदी सध्या गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असून शहरातील सोसायट्या आणि परिसरातील गटारांमधील मैलामिश्रित सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या दूषित पाण्यामुळे वारकरी भाविकांच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे.

काळोखेमळा परिसरातून वाहणाऱ्या ओढ्यात माळीनगर भागातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात असल्याचे समोर आले आहे. हेच दूषित पाणी पुढे इंद्रायणी नदीत मिसळत आहे. याशिवाय पाण्याच्या टाकी परिसरातून, सिद्धेश्वर मंदिराजवळील भागातून तसेच पोलीस चौकीमागील गटारांमधूनही मोठ्या प्रमाणात सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.



काही ठिकाणी एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) साठी बांधण्यात आलेली चेंबर्स फुटल्याने घाणपाणी थेट नदीत मिसळत असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. ओढे आणि नाल्यांच्या परिसरात असह्य दुर्गंधीमुळे नागरिकांना श्वास घेणेही कठीण होत असल्याची परिस्थिती आहे. प्रत्येक मोठ्या धार्मिक सोहळ्यापूर्वी प्रशासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात उपाययोजना केल्या जातात. आढावा बैठका, सूचना आणि तात्पुरते बांध घालून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र सोहळा संपल्यानंतर पुन्हा परिस्थिती पूर्ववत होत असल्याची भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. शासनाच्या श्रीक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत राबविण्यात आलेली भुयारी गटार योजना प्रभावी ठरत नसल्याचेही चित्र दिसून येत आहे. यामुळे शासन वारकऱ्यांच्या आरोग्याशी खेळत आहे का, असा संतप्त सवाल भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. इंद्रायणी नदीत मिसळणारे सांडपाणी तातडीने रोखून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अन्यथा इंद्रायणीची स्थितीही पवना नदी प्रमाणे गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दररोज हजारो भाविक आणि पर्यटक इंद्रायणी नदीत स्नान करून हेच पाणी पवित्र मानून प्राशन करतात. मात्र दूषित पाण्यामुळे कॅन्सर, जुलाब आणि इतर जलजन्य आजारांचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे कार्तिकी यात्रा, संत संत तुकाराम महाराज वैकुंठगमन सोहळा आणि आषाढी पायी वारी यांसारख्या मोठ्या धार्मिक सोहळ्यांवेळी लाखो वारकरी देहूत दाखल होत असतात.

## वाहनांची ये-जा होत असल्याने सुरक्षेसाठी गरज तीव्र

# वळती फाट्यावर सीसीटीव्ही बसवण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** नारायणगाव ते रांजणगाव गणपती अष्टविनायक महामार्गावरील आंबेगाव तालुक्यातील वळती फाटा चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे. या चौकातून मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा अत्यावश्यक बनली आहे.



अष्टविनायक महामार्ग हा आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील नागापूर परिसरातून जात असून या मार्गावर दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. वळती फाटा हा महत्त्वाचा चौक असून येथून मंचरकडे जाणारा रस्तादेखील जोडला जातो. त्यामुळे या ठिकाणी कायम वाहतुकीची गर्दी पाहायला मिळते. अनेक वेळा वाहतुकीचे नियम मोडणे, भरधाव वाहनचालकांचा त्रास तसेच किरकोळ आणि मोठे अपघात घडल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते, चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्यास वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे सोपे होईल. तसेच अपघात किंवा इतर घटनांची माहिती तत्काळ मिळून पोलिसांना तपासासाठी मदत होणार आहे. यामुळे वाहनचालकांमध्येही शिस्त निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मागील महिन्यात वळती गावात आयोजित एका कार्यक्रमाला पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन कांडगे उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी ग्रामस्थांना संबोधित करताना वळती फाटा चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत सूचना केली होती. वळती व नागापूर ग्रामपंचायतींनी संयुक्तपणे पुढाकार घेऊन खर्च उचलत ही यंत्रणा उभारावी, असे आवाहन त्यांनी केले होते.

याबाबत बोलताना वळतीचे सरपंच आनंद वाव्हळ यांनी सांगितले की, "वळती फाटा चौकातील वाहतूक व सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत निश्चितच सकारात्मक विचार केला जाईल."

## मंचर बाजार समितीत कोथिंबिरीला उच्चांकी भाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत उन्हाच्या तीव्र झळांमुळे पालेभाज्यांची आवक घटली असून कोथिंबिरीच्या एका जुडीला तब्बल ५१ रुपये, तर मेथीच्या जुडीला ३१ रुपये भाव मिळाला आहे. चालू हंगामात पालेभाज्यांना मिळालेला हा उच्चांकी दर मानला जात आहे.

दि. ३ मे ते ९ मे २०२६ या आठवड्यात कोथिंबीर, मेथी, शेपू आणि पालक या पालेभाज्यांची आवक काहीशी कमी झाली असून त्याचा थेट परिणाम बाजारभावावर झाल्याचे दिसून येत आहे. याबाबतची माहिती बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी दिली.

अत्यंत कमी कालावधीत येणाऱ्या मेथी, कोथिंबीर, शेपू आणि पालक या पालेभाज्या तीव्र उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणात नष्ट झाल्याने बाजारातील आवक घटली आहे. परिणामी उपलब्ध मालाला चांगला दर मिळत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

विशेषतः आंबेगाव, शिरूर आणि राजगुरूनगर तालुक्यांतील मोजक्याच क्षेत्रात मेथी आणि कोथिंबीर कसाबशी तग धरून असल्याचे चित्र आहे. उष्णतेचा फटका बसल्याने बहुतांश शेतकऱ्यांच्या पालेभाज्यांचे उत्पादन घटले असून बाजारात मालाची टंचाई निर्माण झाली आहे.

## सारांश वृत्त

### पिनाराई विजयन भाड्याच्या घरात

**तिरुवनंतपुरम :** विधानसभा निवडणुकीत एलडीएफ सत्तेतून बाहेर पडल्यानंतर माकपचे ज्येष्ठ नेते पिनाराई विजयन यांनी सोमवारी येथे भाड्याच्या घरात राहायला सुरुवात केली. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणारे विजयन सोमवारी रात्री तिरुवनंतपुरममधील बेकरी जंक्शनमधील भाड्याच्या घरात पोहोचले. त्यांचे जावई आणि माजी मंत्री पी. ए. मोहम्मद रियास आणि माकपचे ज्येष्ठ नेते व्ही. शिवनकुट्टी यांनी त्यांचे स्वागत केले.

### पुढील पाच दिवस वादळी वाऱ्याचे

**अमरावती :** बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या प्रणालीमुळे पुढील पाच दिवसांत राज्यातील अनेक भागात गडगडाटी, वीज चमकणे आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अमरावती येथील हवामान केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, ११ मे रोजी किनारपट्टी आंध्र प्रदेश, यानम आणि रायलसीमा येथे तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, "पुढील पाच दिवसांत आंध्र प्रदेशात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे."

### झारखंड: २.५ कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**रांची :** झारखंड पोलिसांनी पाच जिल्ह्यांतील वेगवेगळ्या कारवाईत २.५४ कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ आणि अवैध दारू जप्त केली असून सात जणांना अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, उत्तर प्रदेशकडे जाणाऱ्या एका ट्रकमधून पोलिसांनी सुमारे २.०८ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रानिया पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भालुटोली गावाजवळ तपासणी मोहिमेदरम्यान हे वाहन अडविण्यात आले. त्यावेळी तपासणी दरम्यान, पोलिसांना अंमली पदार्थ आढळून आले, असे त्यांनी सांगितले आहे.

## हायकमांडने आणखी नेत्यांना दिल्लीला बोलावले

# केरळच्या मुख्यमंत्रीपदावरून काँग्रेसमध्ये पेच

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केरळ विधानसभा निवडणुकीत संयुक्त लोकशाही आघाडीने (यूडीएफ) मिळवलेल्या दणदणीत विजयानंतर मुख्यमंत्रीपदाच्या निवडीवरून काँग्रेसमध्ये अद्यापही पेच कायम आहे. निकाल लागून आठवडा उलटल्यानंतरही काँग्रेस हायकमांडकडून मुख्यमंत्रीपदाबाबत अंतिम निर्णय जाहीर करण्यात आलेला नसल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेतृत्वाने केरळमधील आणखी काही महत्त्वाच्या नेत्यांना दिल्लीला पाचारण केले आहे.

४ मे रोजी विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर यूडीएफने स्पष्ट बहुमतासह सत्ता मिळवली. मात्र, मुख्यमंत्रीपदासाठी अनेक दिग्गज नेत्यांची नावे चर्चेत असल्याने काँग्रेस नेतृत्व सावध भूमिका घेत असल्याचे दिसून येत आहे. सरकार स्थापनेची प्रक्रिया लांबत असल्याने मित्रपक्षांमध्येही अस्वस्थता वाढत असल्याची चर्चा सुरू आहे.

काँग्रेस हायकमांडने ज्येष्ठ नेते आणि नवनिर्वाचित आमदार के. मुरलीधरन यांना मंगळवारी दिल्लीतील एआयसीसी मुख्यालयात उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांच्यासह केपीसीसी उपाध्यक्ष एपी अनिल कुमार, शफी परंबिल, पीसी विष्णुनाथ आणि तिरुवंचूर राधाकृष्णन यांनाही चर्चेसाठी बोलावण्यात आले आहे. मुख्यमंत्री निवडीसंदर्भात विविध गटांची भूमिका आणि आमदारांचे मत जाणून घेण्यासाठी ही सल्लामसलत सुरू असल्याचे समजते.

माध्यमांशी बोलताना के. मुरलीधरन यांनी पुढील ४८ तासांत मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली. केरळ विधानसभेची मुदत २३ मे रोजी संपत असल्याने काँग्रेस नेतृत्वावर निर्णय लवकर घेण्याचा दबाव वाढला आहे.

मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत रमेश चेन्नीथला, के. सी. वेणुगोपाल आणि विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन यांची नावे आघाडीवर मानली जात आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि राहुल गांधी यांनी शनिवारी केरळमधील प्रमुख नेत्यांसोबत बैठक घेत परिस्थितीचा आढावा घेतला होता. सूत्रांच्या माहितीनुसार, अनेक आमदारांचा कल के. सी. वेणुगोपाल यांच्या बाजूने असल्याचे सांगितले जात आहे, तर व्ही. डी. सतीशन यांची जनाधारातील लोकप्रियता काँग्रेससाठी महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, रमेश चेन्नीथला यांनी निर्णयातील विलंबाचे समर्थन करत ही पक्षांतर्गत लोकशाही प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले. "हायकमांड जो निर्णय घेईल तो सर्वांना मान्य असेल," असे त्यांनी सांगितले.

निवडणुकीतील मोठ्या विजयानंतरही मुख्यमंत्री निवडीतील विलंबामुळे यूडीएफमधील काही मित्रपक्षांमध्ये नाराजी वाढत असल्याचे वृत्त आहे. १४० सदस्यीय केरळ विधानसभेत यूडीएफने १०२ जागांवर विजय मिळवत दोन-तृतीयांश बहुमत मिळवले आहे. त्यामध्ये काँग्रेसने ६३, इंडियन युनियन मुस्लिम लीगने २२, केरळ काँग्रेसने ८ आणि रिव्होल्युशनरी सोशलिस्ट पार्टीने ३ जागा जिंकल्या आहेत.

## आता आयटी क्षेत्रासाठी 'वर्क फ्रॉम होम' अनिवार्य करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इंधन बचत आणि अनावश्यक प्रवास टाळण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत नवजात माहिती तंत्रज्ञान कर्मचारी सेनेट या संघटनेने सोमवारी केंद्रीय कामगार व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांना पत्र पाठवले.

आयटी आणि आयटी-सक्षम सेवा क्षेत्रासाठी 'वर्क फ्रॉम होम' अनिवार्य करण्याबाबत सल्लागार निर्देश जारी करावेत, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

संघटनेने पत्रात म्हटले आहे की, महामारीच्या काळात आयटी आणि आयटी क्षेत्राने दूरस्थ पद्धतीने काम करताना उत्पादकता आणि व्यवसाय सातत्य प्रभावीपणे टिकवून ठेवता येते, हे सिद्ध केले होते.

डिजिटल सुविधा उपलब्ध असतानाही लाखो कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात ये-जा करण्यास भाग पाडल्याने इंधनाचा अतिरिक्त वापर, वाहतूक कोंडी आणि शहरी पायाभूत सुविधांवर ताण वाढत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. महानगरांमधील कर्मचारी अशा कामासाठी दररोज अनेक तास प्रवासात घालवत आहेत, जे काम घरातूनही प्रभावीपणे करता येऊ शकते, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

"वर्क फ्रॉम होम'कडे केवळ कर्मचाऱ्यांची पसंती किंवा कॉर्पोरेट लवचिकतेचा उपाय म्हणून पाहता कामा नये. पंतप्रधानांच्या आवाहनाशी सुसंगत असा हा एक जबाबदार आर्थिक आणि राष्ट्रीय हिताचा निर्णय आहे," असे संघटनेने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

संघटनेच्या मते, आयटी कर्मचाऱ्यांसाठी घरून काम अनिवार्य केल्यास इंधनाचा वापर कमी होईल, पर्यावरणावरील ताण घटेल आणि अनावश्यक प्रवास टाळण्यास मदत होईल.

तंत्रज्ञान कंपन्या, बहुराष्ट्रीय कंपन्या, ग्राहक सहाय्यता विभाग आणि सॉफ्टवेअर टीम्स यांनी अनेक वर्षे दूरस्थ पद्धतीने काम करत जागतिक ग्राहकांना सेवा पुरवल्या असून प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण केले आहेत, असेही संघटनेने नमूद केले.

## सेन्सेक्स १,४०० अंकांनी कोसळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** वाढता भू-राजकीय तणाव, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमती आणि रुपयाच्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले असून सोमवारी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. जागतिक स्तरावरील नकारात्मक संकेत आणि सर्वच क्षेत्रांतील विक्रीमुळे प्रमुख निर्देशांक दिवसभर दबावाखाली राहिले.

दिवसभरातील अस्थिर व्यवहारानंतर बीएसई सेन्सेक्स तब्बल १,४०० हून अधिक अंकांनी म्हणजेच १.९ टक्क्यांनी घसरून ७३,९१८ अंकांवर बंद झाला. तर एनएसई निफ्टी ५० हा निर्देशांक २२,१५० या महत्त्वाच्या मानसिक पातळीखाली घसरला. दुपारनंतर बाजारातील कमजोरी अधिक तीव्र झाल्याने विक्रीचा दबाव वाढला.

जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीमध्ये झालेल्या तीव्र वाढीमुळे महागाई वाढण्याची तसेच भारताच्या आयात खर्चावर अतिरिक्त ताण येण्याची भीती निर्माण झाली. तेल दरवाढीमुळे विविध उद्योगांच्या उत्पादन खर्चात वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. परिणामी वित्तीय, वाहन, विमान वाहतूक आणि ग्राहक-केंद्रित क्षेत्रातील समभागांमध्ये मोठी विक्री झाली.

या घसरणीचा परिणाम गुंतवणूकदारांच्या संपत्तीवरही झाला. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल सुमारे ८.९ लाख कोटी रुपयांनी घटले. त्यामुळे सूचीबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजारमूल्य अंदाजे ३६४.२२ लाख कोटी रुपयांवर आले.

बाजारातील ही मोठी घसरण गुंतवणूकदारांमधील वाढती जोखीम टाळण्याची मानसिकता आणि जागतिक आर्थिक अनिश्चिततेबाबतची चिंता अधोरेखित करणारी मानली जात आहे.

## सीमेवरील कुंपणासाठी बीएसएफला जमीन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सोमवारी झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली. यामध्ये भारत-बांगलादेश सीमाभागात कुंपण उभारण्यासाठी सीमा सुरक्षा दलाला (बीएसएफ) जमीन हस्तांतरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना अधिकारी यांनी राज्यात "सुशासन" आणि "सुरक्षा" यांना प्राधान्य दिले जाईल, असे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी विकास' या संकल्पनेनुसार नवीन भाजप सरकार काम करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारत-बांगलादेश सीमाभागात कुंपण उभारण्यासाठी राज्य सरकारकडून बीएसएफला पुढील ४५ दिवसांत जमीन सुपूर्द करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत, मागील सरकारने बेकायदेशीर घुसखोरांना संरक्षण देण्यासाठी ही प्रक्रिया जाणीवपूर्वक लांबवली होती, असा आरोपही त्यांनी केला.

राज्यात आयुष्मान भारत, प्रधानमंत्री विश्वकर्मा आणि बेटी बचाओ बेटी पढाओ या केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचेही अधिकारी यांनी जाहीर केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सरकारी नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना वयोमर्यादेत पाच वर्षांची शिथिलता देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मागील सरकार नवीन फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरल्याचा आरोप करत, भारतीय न्याय संहितेसह नव्या फौजदारी कायद्यांची राज्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. गृह मंत्रालयाने जारी केलेल्या जून २०२५ च्या जनगणना परिपत्रकाची तात्काळ अंमलबजावणी करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पुढील मंत्रिमंडळ बैठक पुढील सोमवारी होणार आहे.

## ममता बॅनर्जींना नवी याचिका दाखल करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालय यांनी सोमवारी ममता बॅनर्जी आणि इतर याचिकाकर्त्यांना विजयाच्या फरकाशी संबंधित मुद्द्यांवर नव्याने याचिका दाखल करण्यास सांगितले. नुकत्याच पार पडलेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत अनेक मतदारसंघांमध्ये विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान वगळण्यात आलेल्या मतांच्या संख्येपेक्षा भाजप उमेदवारांचा विजयाचा फरक कमी असल्याचा दावा करण्यात आला होता.

कल्याण बॅनर्जी यांनी ३१ मतदारसंघांबाबत आक्षेप घेतल्यानंतर सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने सादर करण्यात आलेल्या युक्तिवादांची दखल घेतली. संबंधित मतदारसंघांमध्ये वगळलेल्या मतदारांची संख्या आणि विजयाचे अंतर यामध्ये गंभीर तफावत असल्याचा मुद्दा याचिकाकर्त्यांकडून मांडण्यात आला. मात्र, निवडणूक आयोग यांनी या दाव्यांना विरोध करत अशा वादांवर योग्य उपाय म्हणजे निवडणूक याचिका असल्याचे स्पष्ट केले. तसेच मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाशी संबंधित बाबी आणि मतदारांची नावे समाविष्ट किंवा वगळण्याविरोधातील अपील प्रक्रियेबाबत निवडणूक आयोगाला वैधानिक अधिकार असल्याचे आयोगाने न्यायालयात नमूद केले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत २९४ सदस्यीय विधानसभेत भारतीय जनता पार्टी ने २०७ जागांवर विजय मिळवला, तर तृणमूल काँग्रेसला ८० जागांवर समाधान मानावे लागले.

## यूपीआय पेमेंट, सीसीटीव्हीमुळे आरोपींपर्यंत पोहोचले पोलिस

## अधिकारींच्या पीएच्या हत्येचा उलगडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांचे स्वीय सहायक चंद्रनाथ रथ यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी बिहारमधील बक्सर जिल्ह्यातून तिघांना ताब्यात घेतले असून, डिजिटल पुरावे आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास यंत्रणांनी आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळवले आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी गुन्हे अन्वेषण विभाग आणि विशेष कृती दलाने संयुक्त विशेष तपास पथक स्थापन केले होते. विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयानंतर ६ मे रोजी रात्री चंद्रनाथ रथ यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. रात्री सुमारे दहा वाजता ते घरी परतत असताना त्यांच्या एसयूव्हीला अडवून हल्लेखोरांनी जवळून गोळीबार केला. या हल्ल्यात रथ यांचा मृत्यू झाला, तर चालक बुद्धदेव बेरा गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

तपासादरम्यान पोलिसांना महत्त्वाचा धागा एका यूपीआय व्यवहारातून मिळाला. हत्येसाठी वापरण्यात आलेली चांदीच्या रंगाची कार घटनेपूर्वी एका टोल नाक्यावरून गेली होती. तेथे कारमधील व्यक्तींनी टोल शुल्क यूपीआयद्वारे भरले होते. या व्यवहारातून मिळालेल्या मोबाईल क्रमांकाच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा माग काढला. टोल नाक्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये वाहन आणि त्यातील संशयित स्पष्टपणे दिसत असल्याने तपास अधिक वेगाने पुढे सरकला.

सूत्रांच्या माहितीनुसार, पश्चिम बंगाल एसटीएफने विशाल श्रीवास्तव, मयंक मिश्रा आणि विकी मौर्य या तिघांना ताब्यात घेतले आहे. मात्र, त्यांच्या अटकेची अधिकृत घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. विशाल श्रीवास्तव याच्यावर बक्सर जिल्ह्यात हत्या आणि लुटीसह २२ हून अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

तपासात आणखी धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. हल्लेखोरांनी गोळीबारानंतर वापरलेली कार सोडून दुसऱ्या लाल रंगाच्या कार आणि मोटारसायकलींचा सहाय्याने पळ काढला होता. पोलिसांनी या गुन्ह्याशी संबंधित दोन मोटारसायकली जप्त केल्या असून, सर्व वाहनांवर बनावट नंबर प्लेट्स लावण्यात आल्याचे समोर आले आहे. या हल्ल्यात 'ग्लॉक ४७एक्स' या ऑस्ट्रियन बनावटीच्या अत्याधुनिक पिस्तुलाचा वापर झाल्याने तपास अधिक गंभीर बनला आहे. भारतातील गुन्हेगारी घटनांमध्ये अशा प्रकारची शस्त्रे अत्यंत दुर्मिळ मानली जातात. त्यामुळे या हत्येमागे आंतरराष्ट्रीय किंवा सीमापार गुन्हेगारी जाळ्याचा संबंध आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे.

## ओमर अब्दुल्ला यांची अमित शाह यांच्याशी चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्लीत भेट घेतली. या बैठकीत जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याच्या दीर्घकालीन मागणीसह विविध प्रशासकीय आणि सुरक्षा विषयांवर चर्चा झाल्याचे समजते.

दिल्लीला रवाना होण्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री अब्दुल्ला यांनी राज्याचा दर्जा पुनर्संचयित करण्याचा मुद्दा बैठकीत मांडणार असल्याचे स्पष्ट केले. "एका बैठकीनंतरच राज्याचा दर्जा मिळाला असता तर तो आम्हाला खूप आधीच मिळाला असता. मात्र, मी बैठकीत राज्याचा दर्जा, कामकाजाचे नियम आणि जम्मू-काश्मीरशी संबंधित इतर प्रश्न उपस्थित करणार आहे," असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक सुरक्षा कार्यक्रमांदरम्यान नायब राज्यपालांना दूरसंचारविषयक अधिकार देण्याच्या निर्णयावेही अब्दुल्ला यांनी समर्थन केले. सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी नायब राज्यपालांकडे असल्याने हे अधिकार त्यांच्याकडे असणे योग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

"हे अधिकार कामकाजाच्या नियमांच्या किंवा पुनर्रचना कायद्याच्या विरोधात नाहीत. फोन सेवा किंवा इंटरनेट बंद करण्याचे आदेश गृह विभागाकडून दिले जातात आणि तो विभाग नायब राज्यपालांच्या अखत्यारीत येतो," असेही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात जम्मू आणि काश्मीरच्या नायब राज्यपालांना सार्वजनिक सुरक्षा किंवा राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितीत दूरसंचार सेवांशी संबंधित विशेष अधिकार बहाल केले आहेत. यामध्ये सिग्नल रोखणे, सेवा निलंबित करणे आणि संदेशांचे डिक्रिप्शन करण्याचे अधिकार समाविष्ट आहेत.

गुरुवारी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, दूरसंचार कायदा २०२३ अंतर्गत राष्ट्रपतींनी नायब राज्यपालांना राज्य सरकारचे अधिकार वापरण्याचे निर्देश दिले आहेत. हे अधिकार सार्वजनिक सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित परिस्थिती हाताळण्यासाठी लागू करण्यात आले आहेत.

## डोनाल्ड ट्रम्प यांचा चीन दौरा

**बीजिंग :** चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प १३ ते १५ मे या कालावधीत चीनच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत, अशी माहिती चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सोमवारी दिली. जवळपास नऊ वर्षांतील अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच चीन दौरा असेल. ट्रम्प स्वतः २०१७ मध्ये त्यांच्या पहिल्या कार्यकाळात चीनला भेट देणारे शेवटचे अमेरिकन अध्यक्ष होते. अमेरिका आणि चीनमधील वाढता तणाव या दरम्यान ही भेट होत आहे.

## मुख्यमंत्री विजय यांची स्टॅलिन यांना सदिच्छा भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी सोमवारी चेन्नईतील अलवरपेट येथे जाऊन डीएमके अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांची सदिच्छा भेट घेतली. विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर विजय आणि स्टॅलिन यांच्यातील हा पहिलाच औपचारिक संवाद ठरला.

यावेळी स्टॅलिन तसेच उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी विजय यांचे स्वागत केले. विजय यांच्या आगमनानंतर उदयनिधी यांनी हस्तांदोलन करत त्यांना आलिंगन दिले. त्यानंतर बैठकीदरम्यान स्टॅलिन यांनीही विजय यांचे आलिंगन देत स्वागत केले. दोन्ही नेत्यांनी पुष्पगुच्छांची देवाणघेवाण केली तसेच परस्परांना रेशमी शाली परिधान करून सन्मान व्यक्त केला.

अलीकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत डीएमके आणि विजय यांच्या टीव्हीके पक्षात चुरशीची लढत झाली होती. या निवडणुकीत टीव्हीकेने विजय मिळविल्यानंतर काही आठवड्यांतच झालेल्या या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा एआय चॅटबॉटही सुरू

# न्यायालयीन व्यवस्थेसाठी 'वन केस वन डेटा' उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सोमवारी न्यायालयीन माहितीचे एकत्रीकरण आणि न्यायालयीन सेवांची सार्वजनिक उपलब्धता अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण डिजिटल उपक्रमांची घोषणा केली. यामध्ये 'वन केस वन डेटा' या एकात्मिक प्रणालीसह 'सु सहाय' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅटबॉटचा समावेश आहे.

दिवसाच्या कामकाजाच्या सुरुवातीला सरन्यायाधीशांनी सांगितले की, देशभरातील उच्च न्यायालये, जिल्हा न्यायालये आणि तालुका न्यायालयांमधील माहिती एकत्रित करणारी बहुस्तरीय प्रणाली विकसित करण्यासाठी न्यायपालिका 'वन केस वन डेटा' हा उपक्रम सुरू करत आहे.

"सर्व उच्च न्यायालये, जिल्हा आणि तालुका न्यायालयांमधील तपशील एका एकात्मिक व्यवस्थेत समाविष्ट करून अधिक कार्यक्षम खटला व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे," असे सरन्यायाधीशांनी नमूद केले. या उपक्रमामुळे देशभरातील न्यायालयीन माहितीचा एकत्रित आणि परस्पर जोडलेला डिजिटल डेटाबेस तयार होईल. त्यामुळे खटल्यांचे व्यवस्थापन अधिक सुव्यवस्थित आणि पारदर्शक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

याचबरोबर, सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळाशी संलग्न 'सु सहाय' या एआय-आधारित सहाय्यक चॅटबॉटचे उद्घाटनही करण्यात आले. हा चॅटबॉट राष्ट्रीय माहिती केंद्राने सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदणी विभागाच्या सहकार्याने विकसित केला आहे. "या सुविधेमुळे नागरिकांना सर्वोच्च न्यायालयाच्या आवश्यक सेवांबाबत थेट मार्गदर्शन आणि माहिती सहजपणे मिळू शकेल," असे सरन्यायाधीशांनी सांगितले.

डिजिटल उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी योगदान देणाऱ्या नोंदणी विभागातील अधिकारी आणि बार सदस्यांच्या प्रयत्नांचेही त्यांनी कौतुक केले. "हे उपक्रम सर्व संबंधितांसाठी लाभदायक ठरतील, असा मला पूर्ण विश्वास आहे," असेही त्यांनी नमूद केले.